# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः28.08.2024** **वारःबुधवार**

---

**ठळक बातम्या**

1) देशाच्या खरीप पिकांच्या पेरणीमध्ये या वर्षी लक्षणीय प्रगती

2) भारत लवकरच जगातली तिसरी सर्वात मोठी अर्थव्यवस्था बनेल,केंद्रीय माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांचं प्रतिपादन, आंतरराष्ट्रीय नाणेनिधीच्या अहवालात भारतीय अर्थव्यवस्थेच्या वाढीचा 7 टक्के दर घोषित.

3) वस्त्रोद्योग क्षेत्रातील चार स्टार्ट-अपना प्रत्येकी पन्नास लाख रुपये
आणि पाच शिक्षण संस्थांना वीस कोटी रुपयांचं अनुदान वस्त्रोद्योग मंत्रालयाकडून मंजूर

4) भारतीय क्रिकेट नियामक मंडळाचे सचिव जय शाह यांची आयसीसीच्या अध्यक्षपदी बिनविरोध निवड

आणि

5) पॅराऑलिंपिक स्पर्धेला आजपासून पॅरीस इथं सुरुवात

**पेरणी**

देशात खरीप पिकांच्या पेरणीमध्ये या वर्षी लक्षणीय प्रगती झाली आहे, एकूण  लागवडीखालील क्षेत्र 1 हजार 65 लाख हेक्टरपेक्षा जास्त असून तुलनेनं गेल्या वर्षी याच कालावधीत अंदाजे 1 हजार 44 लाख हेक्टर क्षेत्रात पिकांची पेरणी झाली होती. कृषी आणि शेतकरी कल्याण विभागानं खरीप पिकांच्या पेरणीचा अहवाल प्रसिद्ध केला  त्यात ही माहिती देण्यात आली आहे. या अहवालानुसार भाताचं पेरणी क्षेत्र 394 लाख 28 हजार हेक्टरवर पोहोचले असून गेल्या वर्षीच्या याच कालावधीत हे  क्षेत्र 378 लाख 4 हजार हेक्टर इतकं होतं. तर कडधान्य पिकाच्या पेरणीमध्ये गेल्या वर्षीच्या 115 लाख 55 हजार हेक्टर क्षेत्रावरून यंदा 122 लाख 16 हजार हेक्टरक्षेत्रावर पेरण्या झाल्या आहेत. भरडधान्य पिकांची  पेरणी देखील 185 लाख  51 हजार हेक्टरवर झाली आहे, जी गेल्यावर्षी 177 लाख  50 हजार हेक्टर इतकी  होती. तसंच तेलबियांच्या उत्पादनातही वाढ झाली असून,188 लाख 37 हजार हेक्टरवर  तेलबिया पिकांची पेरणी झाली आहे.

**अर्थव्यवस्था**

भारत लवकरच जगातली तिसरी सर्वात मोठी अर्थव्यवस्था बनेल,असं मत केंद्रीय माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी व्यक्त केलं. ते काल आंतरराष्ट्रीय नाणेनिधीनं जारी केलेल्या

जागतिक अहवालात नमूद करण्यात आलेल्या भारतीय अर्थव्यवस्थेच्या वाढीचा 7 टक्के दराच्या आधारे बोलत होते. या अहवालानुसार चीनच्या अर्थव्यवस्थेचा विकास दर 5 टक्के, अमेरिकेचा अंदाजे 2 पूर्णांक 6 टक्के इतका आहे. तर जगातील सर्वात वेगानं वाढणाऱ्या दहा अर्थव्यवस्थांमध्ये इंडोनेशिया, तुर्की, रशिया, पोलंड, स्पेन आणि मेक्सिको या देशांचा समावेश आहे.दरम्यान, आंतरराष्ट्रीय नाणेनिधीनं गेल्या महिन्यात जारी केलेल्या अहवालात 2024-25 साठी भारताचा सकल देशांतर्गत उत्पन्नवाढीचा अंदाज 6 पूर्णांक 8 टक्क्यांवरून 7 टक्क्यांपर्यंत जाईल असं म्हटलं आहे.

**मोदी-पुतिन**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांच्याशी दूरध्वनीवरून संवाद साधून आणि रशिया-युक्रेन युद्धसंघर्षाबद्दल चर्चा केली.दोन्ही देशांमधील धोरणात्मक भागीदारी आणखी सक्षम करण्याच्या उपायांवरदेखील या संभाषणा दरम्यान चर्चा झाली असून युक्रेनच्या नुकत्याच झालेल्या भेटीच्या माहितीसह युद्धसंघर्षाच्या शांततापूर्ण आणि त्वरित निराकरणासाठी भारताच्या दृढ वचनबद्धतेचाही त्यांनी पुनरुच्चार केल्याचं पंतप्रधान मोदी यांनी समाजमाध्यमावरील संदेशात म्हटलं आहे.

**भारत-ब्राझिल**

पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्री,हरदीप सिंग पुरी यांनी काल नवी दिल्लीत ब्राझीलचे परराष्ट्र व्यवहार मंत्री माउरो व्हिएरा यांची भेट घेतली.या भेटी दरम्यान भारत आणि ब्राझील यांच्यातील हायड्रोकार्बन आधारित ऊर्जा भागीदारीबद्दल सकारात्मक चर्चा झाल्याचं पुरी यांनी समाजमाध्यमावरील संदेशात म्हटलं आहे.याशिवाय व्यापारी गुंतवणुक आणि जैवइंधन क्षेत्रातील परस्पर सहकार्याच्या प्रयत्नांवरही चर्चा झाल्याचं पुरी यांनी सांगितलं. जागतिक जैवइंधन गटाची घोषणा झाल्यापासून याबाबतीत ब्राझीलच्या सातत्यपूर्ण समर्थनाबद्दल पुरी यांनी समाधान व्यक्त केलं. याशिवाय हंगेरी देखील या गटामध्ये सहभागी झाल्यामुळे आता 25 देश आणि 12 आंतरराष्ट्रीय संस्थांसह जागतिक जैवइंधन गटाची व्याप्ती विस्तारल्याचंही हरदीप सिंग पुरी यांनी सांगितलं.

**भारत-चिली**

कृषी आणि शेतकरी कल्याण राज्यमंत्री रामनाथ ठाकूर यांनी काल नवी दिल्लीत चिलीचे कृषी मंत्री एस्टेबान व्हॅलेन्झुएला आणि त्यांच्या शिष्टमंडळाची भेट घेतली. दोन्ही देशांमधील कृषी सहकार्य,फलोत्पादन कृती आराखडा यासह सामंजस्य करारांची प्रभावी अंमलबजावणी आणि परस्पर सहकार्याच्या महत्त्वाच्या मुद्यांवर या बैठकीत चर्चा करण्यात आली.याशिवाय भारत आणि चिली या दोन्ही देशांमधील कृषी आव्हाने तसंच कृषी व्यापाराला चालना देण्यासाठीच्या संधींबाबत

सविस्तर चर्चा करण्यात आली.दोन्ही देशांमधील कृषीविषयक सहकार्य अधिक दृढ करण्यासाठी आपण वचनबद्ध आहोत असंही रामनाथ ठाकूर यांनी सांगितलं.

**कोळसा**

देशाच्या एकूण कोळसा उत्पादनात या वर्षी आतापर्यंत 7.12 टक्के  इतकी लक्षणीय वाढ नोंदवल्याचं कोळसा मंत्रालयानं काल जारी केलेल्या पत्रकात म्हटलं आहे.25 ऑगस्टपर्यंत नोंदवण्यात आलेल्या आर्थिक वर्षात देशाचं एकत्रित कोळसा उत्पादन वाढून 370 दशलक्ष टन झालं आहे, जे गेल्या वर्षी याच कालावधीत 346 दशलक्ष टन  इतकं होतं.तसंच कोळशाच्या वितरणातही लक्षणीय वाढ झाली असून  यावर्षी 25 ऑगस्टपर्यंतचं वितरण 397 दशलक्ष टनांवर पोहोचलं आहे. मंत्रालयाने पुढे सांगितले की, मागील गेल्या वर्षीच्या 376 दशलक्ष टन  वितरणाच्या तुलनेत आत्ता 5.48 टक्के इतकी उल्लेखनीय वाढ वितरणात दिसत आहे,असंही कोळसा मंत्रालयानं म्हटलं आहे.

**रेशीम-स्टार्टअप**

वस्त्रोद्योग मंत्रालयानं प्रत्येकी पन्नास लाख रुपयांच्या अनुदानासह चार स्टार्ट-अपना  मंजुरी दिली आहे. नवी दिल्लीत काल राष्ट्रीय तांत्रिक वस्त्रोद्योग अभियानाच्या कार्यक्रम समितीच्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला.हे चारही स्टार्टअप कंपोझिट, शाश्वत कापड आणि स्मार्ट टेक्सटाइल या प्रमुख धोरणात्मक क्षेत्रांवर केंद्रित आहेत.
याशिवाय तांत्रिक वस्त्रोद्योग क्षेत्रातील पाच शिक्षण संस्थांना शैक्षणिक संस्था सक्षम करण्यासाठी सुमारे वीस कोटी रुपयांचे अनुदान मंजूर केले आहे. या  शिक्षण संस्थांनी आहे, ज्यात जिओटेक्स्टाइल, भू-संश्लेषण, कंपोझिट, नागरी संरचना इत्यादी तांत्रिक वस्त्रोद्योग क्षेत्रात नवीन बी.टेक अभ्यासक्रम सुरू करण्याचं प्रस्तावित केलं आहे.

**वक्फ**

वक्फ (दुरुस्ती) विधेयक, 2024 साठी सामान्य नागरिक, विविध स्वयंसेवी संस्था, तज्ञ, इतर भागधारक आणि संबंधित संस्थांकडून मतं आणि सूचना मागवण्यात आल्या आहेत. लोकसभा खासदार जगदंबिका पाल यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन करण्यात आलेल्या संसदेच्या संयुक्त समितीनं या सूचना मागवल्या आहे. यासंदर्भात लोकसभा सचिवालयानं निवेदन जारी केलं आहे. संयुक्त संसदीय समितीला लेखी सूचना सादर करू इच्छिणाऱ्यांनी दोन प्रतींमध्ये इंग्रजी किंवा हिंदीमध्ये आपलं म्हणणं मांडणं अपेक्षित आहे. यासंदर्भातील जाहिरात प्रसिध्द झाल्याच्या 15 दिवसांत संबंधितांनी आपली मतं मांडावीत. या निवेदनानुसार, समितीला सादर केलेल्या सूचना समितीच्या नोंदींचा भाग बनतील आणि हा दस्तऐवज ‘गोपनीय’ मानला जाईल.

**अथलेटिक्स**

पेरूमधील लीमा इथं सुरु असलेल्या 20 वर्षांखालील जागतिक अथलेटिक्स अजिंक्यपद स्पर्धेत भारताचे जय कुमार, नीरु पाठक, रिहान चौधरी आणि संद्रामोल साबू यांनी काल ४ बाय 400 मीटर मिश्र रिले प्रकारांत पात्रता फेरी पार केली आहे. यासह भारतीय संघ 20 प्रतिस्पर्धी संघांमध्ये तिसऱ्या स्थानावर आहे.

**आयसीसी-अध्यक्ष**

भारतीय क्रिकेट नियामक मंडळाचे विद्यमान सचिव जय शाह यांची आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषद अर्थात ICC च्या अध्यक्षपदी बिनविरोध निवड झाली आहे. अध्यक्षपदासाठी शहा हे एकमेव उमेदवार होते. यावर्षी 1 डिसेंबर रोजी ते आपल्या पदाचा कार्यभार स्वीकारतील. 35 वर्षांचे शाह हे पद भूषवणारे सर्वात तरुण उमेदवार आहेत. ICC चे विद्यमान अध्यक्ष ग्रेग बरक्ले त्यांच्या कारकिर्दिचा तिसऱ्या कार्यकाळात पदभार स्विकार नसल्याचं  या महिन्याच्या 20 तारखेला जाहीर करण्यात आलं होतं. यावर्षी नोव्हेंबर मध्ये ते सेवानिवृत्त होतील.

**पॅराऑलिंपिक**

यावर्षी दिव्यांगांसाठीच्या पॅराऑलिंपिक स्पर्धेला आजपासून पॅरीस इथं सुरुवात होत आहे. या स्पर्धा 8 सप्टेंबर पर्यंत चालणार आहेत. यामध्ये 84 भारतीय क्रिडापटू सहभागी झाले असून पॅरालिम्पिकच्या इतिहासातील ही भारताची सर्वात मोठी तुकडी आहे. पॅरा सायकलिंग, पॅरा ज्युडो आणि पॅरा रोइंग या प्रकारांत प्रथमच भारतीय क्रिडापटू आपलं कौशल्य अजमावणार आहेत. या स्पर्धेतील 22 पैकी 12 क्रिडाप्रकारांमध्ये हे दिव्यांग खेळाडू खेळणार आहेत. उद्या पॅरा बॅडमिंटन, तायकाँदो, सायकलिंग, जवतरण आणि टेबलटेनिस पासून आपले खेळाडू स्पर्धेची सुरुवात करतील.  2020 मध्ये झालेल्या टोकिओ आलिंपिकमधील सुवर्णपदक विजेता भालाफेकपटू सुमित अंतिल आणि टेबल टेनिसपटू भावना पटेल यांच्याकडून या स्पर्धेत पदकांची अपेक्षा आहे.

**याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं. नमस्कार.**